# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक: 21.03.2024** **वार: गुरुवार**

---

**मालवेअर**

बनावट वेबसाइट्स मालवेअरचा प्रसार करण्यासाठी मोठे माध्यम बनल्या आहेत. ग्राहक केवळ पायरेटेड चित्रपट किंवा दूरचित्रवाणी कार्यक्रम पाहात नसून ते त्यांच्या डिजिटल उपकरणासोबत तडजोड करत असल्याचा इशारा माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी दिला आहे. इंडियन स्कूल ऑफ बिझनेसद्वारे सायबर सुरक्षेबाबत केलेल्या सर्वंकष अभ्यासावरील अहवालाचं प्रकाशन करण्याच्या कार्यक्रमात ते आज मुंबईत बोलत होते. तुमचं 'डिजिटल उपकरण' म्हणजे 'दुसरे तुम्हीच' आहात. त्यात तुमची ओळख, तुमचा बँकिंग तपशील, तुमचे मित्र आणि कुटुंबीय यांचा तपशील असतो. प्रौढांविषयीच्या साईट्स 57 टक्के आणि जुगाराशी संबंधित जाहिरातींच्या 53 टक्के तुलनेत पायरसी साइट्समध्ये प्रवेश केल्याने मालवेअर संसर्गाचा 59 टक्के जास्त धोका उद्भवतो असा ठळक निष्कर्ष या अहवालात मांडण्यात आला आहे.

**मनपा**

पुणे महापालिकेला 2023-24 या आर्थिक वर्षासाठी मिळकतकराचं 2 हजार 91 कोटी रुपये उत्पन्न मिळालं आहे. गेल्या वर्षीपेक्षा हे उत्पन्न 315 कोटी रुपयांनी अधिक आहे. मिळकत कर भरण्यासाठी नागरी सुविधा केंद्र सर्व शासकीय सुटीच्या दिवशी आणि शनिवारी सकाळी दहा ते दुपारी चार या वेळेत, तर रविवारी सकाळी दहा ते दुपारी दोन या वेळेत खुली ठेवण्यात येणार आहे. ऑनलाइन पद्धतीनंही मिळकत कर भरता येणार आहे.

**आजोबा**

शिरुर लोकसभा मतदारसंघातील निरगुडसर इथं ढोल ताशांच्या गजरात पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयाचे विद्यार्थी गावातील ज्येष्ठ नागरिकांपर्यंत पोहोचले आणि 'आजोबा मतदानाला यायचं हं!' असं म्हणत त्यांना जागरुक नागरिक या नात्यानं मतदान करण्याचं आवाहन केलं. ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि शिक्षक मतदान जागृती उपक्रमात उत्साहानं सहभागी होत आहेत. शिक्षक अभिनव संकल्पना राबवून विद्यार्थ्यांचे कलागुण आणि मतदान जागृतीचा सुरेख समन्वय साधताना दिसत आहेत.

**शिक्षक**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात स्वीप उपक्रम राबविण्यात येत आहे. 208 वडगाव शेरी विधानसभा मतदार संघात शिक्षकांच्या माध्यमातून जास्तीत जास्त पालक, विद्यार्थी आणि नागरिकांपर्यंत पोहोचण्याच्या उद्देशाने संत ज्ञानेश्वर प्राथमिक विद्यालयात शिक्षकांच्या प्रशिक्षण कार्यक्रमात मतदान जागृती करण्याचं आवाहन करण्यात आलं.

**गणवेष**

राज्यातील शालेय विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षकांना देखील गणवेश अनिवार्य करण्याच्या शासकीय निर्णयाला शिक्षक आणि मुख्याध्यापक संघटनेनं तीव्र विरोध दर्शवला आहे. राज्यातील बहुतांश शाळांमधील शिक्षकांना आपली जबाबदारी योग्य पद्धतीनं समजते, त्यामुळं शाळेत येताना ते योग्य पद्धतीचे कपडे परिधान करून येत असल्याचा दावा शिक्षक संघटनेकडून करण्यात आला आहे. कोणत्याही प्रकारचे चित्रविचित्र आणि आक्षेपार्ह स्वरुपाचे कपडे शिक्षकांनी परिधान केल्याची घटना उघडकीस आलेली नाही त्यामुळं शिक्षकांसाठी गणवेशासारखा कोणताही निर्णय जाहीर करण्यापूर्वी संघटनांशी चर्चा करणं आवश्यक असल्याची प्रतिक्रिया पुणे जिल्हा शिक्षक संघटनेकडून व्यक्त करण्यात आली आहे.

**दिव्यांग**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागातील दिव्यांग कक्षाच्या वतीनं दिव्यांग भवन फाऊंडेशन या कंपनीसाठी भरण्यात येणा-या विविध 31 पदांच्या मुलाखती स्थगित करण्यात येत असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली आहे. पुढील तारीख आणि वेळ महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येईल असं पालिका प्रशासनानं सांगितलं.

**पृथ्वीराज**

पुणे महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी पृथ्वीराज बी.पी. यांची नियुक्ती झाली असून त्यांनी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. मोठ्या शहरामध्ये काम करण्याची ही आपली पहिलीच वेळ असल्याचं त्यांनी नंतर बातमीदारांशी बोलताना सांगितलं.

**हॉकी**

चौदाव्या हॉकी इंडिया वरिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत आज रात्री उपांत्य सामने रंगणार आहेत. यजमान महाराष्ट्र संघाला अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी गत विजेता मध्य प्रदेश संघाचं आव्हान आहे. दुसरी उपांत्य लढत झारखंड आणि हरियाणा यांच्यात होणार आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात दिवसा उन्हाची काहिली होत आहे. आज कमाल 37 अंश सेल्सियस कमाल तापमानाची नोंद झाली. उद्या कमाल 38 अंश सेल्सियस तापमान राहील. 27 मार्चपर्यंत यात आणखी वाढ होऊन ते 39 अंशांपर्यंत जाण्याचा इशारा पुणे वेधशाळेनं दिला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**